प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे विरचित

# आरती संग्रह

रचनाकार
प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत
प्रकाशन मंच

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे विरचित**
**आरती संग्रह**
Aarti Sangrah

**रचनाकार**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथमावृत्ती** : २०२२

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**मूल्य** ६०/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**प्रवरा तीर-संस्कृतीस**

# प्रवरा संस्कृतीस वंदन

पावन प्रवरा अमृतवाहिनी तीरी अकोले ग्रामात जन्म झाला, बागडलो, खेळलो, हुंदडलो, संस्कारित झालो, प्रतिष्ठित झालो प्रवरा संस्कृतीत.

अमृतवाहिनी तीरीचे लोक सुसंस्कृत, अमृतत्त्वाचा विचार करणारे.

महर्षी अगस्तिमुनी आणि माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या अनुग्रहाने सामरस्याचा विचार आणि प्रसार करणारे.

ह्या संस्कृतीत शैव, शाक्त, गाणपत्य, सूर्य आणि वैष्णव आदि सर्व संप्रदाय, दैवतांच्या आश्रयाने फुलले. ही भक्ति-ज्ञान-वैराग्य या मार्गाने अद्वैताचे वैभव तनमनात मिरविणारी संस्कृती.

अकोले परिसरातील पावन प्रवरा तीरीच्या दैवतांची वंदना अर्चना या रचना सेवेतून घडावी एवढीच प्रार्थना. या सांस्कृतिक भावविश्वाच्या चरणी.

**– प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

* * *

# अमृतवाहिनी प्रवरा वंदनाष्टक

जीवनांदु बिंदू बिंदू एकवटूनि वाहते
त्रिदेव देव सर्व ऋषी मुनि सिद्ध वंदिते
पर्वणी प्रवरारसात जीव जीव जगविते
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।१।।

विमलजला शुद्धजला मानवास पोषिते
क्षिरवाहिनी अतिनिगुती पशूपक्षा जोगते
तृणवेली वृक्षराजी बहरती तुझ्या कृपे
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।२।।

रत्नामृत अभिलाशे देवासूर तंडती
नारद शिव अगस्त्य विनवी विष्णू हो कृपानिधी
प्रसन्न होत मोहिनी धारामृत दे वाहते
त्वदीय पाद पंकजं नमामि देवी अमृते ।।३।।

तव तटी मुनी अगस्त्य विद्याश्रम उभविती
कृषी आरोग्य धनुर्योति दान हो अहर्निशी
गोपालन संधारण न्याय नीति शिकवते
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।४।।

राम सिद्धी परिक्रमा शिवपूजन साधने
वंदिती परोपरी अर्घ्य देत प्रतिदिने

मुळा अढळा म्हाभुंगी पावन हो पर्वर
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।५।।

रामायण सिद्ध करिती ऋषीवाल्मिकि तवतटी
रसूनिया देवीसीता लवकुश सांभाळिती
हनुमत चरित दिव्य मुखि अगस्त्य प्रकटते
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।६।।

राहवध सुदर्शने मोहिनिराज प्रकटती
मोहिनी हो म्हाळसा मार्तंडा परिणती
कृष्णवंती राधिका प्रवररसा बिलगते
त्वदीय पादपंकजं नमामि देवी अमृते ।।७।।

प्रवरकथा धौम्यऋषी पांडवा निवेदिती
बिल्ववनी नि संगमी दिव्यक्षेत्र प्रकटती
ज्ञानमुखे गीतामृत मराठीत वैभवे
त्वदीय पादपंकजं नममि देवी अमृते ।।८।।

*

## गणपतीची आरती

प्रवरा नदीच्या काठावर फुललेल्या प्राचीनतम संस्कृतीचे दर्शन आरतींच्या माध्यमातून भावभक्तीने अनुभवतांना प्रथम वंदना विघ्नहर, सिद्धिदाता श्री गणेश यांनाच सादर व्हावी– महर्षी अगस्त्य पंचायतनातही श्री सिद्धिविनायकांचे स्थान अग्रभागीच आहे.

जयदेव जयदेव जय जय गणराया । स्वामी गणराया
सर्वारंभी नमितो । तुजश्री विघ्न हरा ।।धृ।।

समस्त देव ही प्रकटती । स्वरूपे विनायका ।
मंगलमूर्ति गणेशा । सुखवी भक्तगणा ।
तू शिव विष्णू तू । तू ब्रह्मा ओंकारा ।
ज्ञानमूर्ति तू अवघा । गणपति तू योद्धा ।।१।।

तू अधिपती विश्वाचा । सिद्धिधन दाता ।
आरोग्य विद्या दाता । सांभाळी जगता ।
तू मंत्र तू चिंतामणी । पुरवि मनोरथा ।
निर्विघ्न सिद्ध होती । कार्ये तुज नमिता ।।२।।

सद्गुरू तू माता । पिता तुच सखा ।
आलो तुझिया चरणा । सांभाळी बालका ।
भावभक्तिच्या ज्योती । ओवाळित तुजला ।
अनिल म्हणे सांभाळी । आम्हा आर्त जना ।।३।।

*

## क्षेत्रीय दैवत श्री सिद्धेश्वरांची आरती–वंदना

पवित्र क्षेत्र अकोले नगरीत, अतिप्राचीन असे, श्री सिद्धेश्वरांचे, विविध शिल्पशैलीतून आकारलेले, शिवमंदिर, अमृतवाहिनी प्रवरेच्या दक्षिण तीरावर, प्राचीनतम काळापासून, विकसित होत गेलेल्या; हिंदूसंस्कृतीचे हृद्य दर्शन घडविते. महर्षी अगस्ती पंचायतनातील, हे स्थान कदाचित महर्षींनी, आपल्या गुरुकुलातील साधकांसाठी, स्थापित केले असावे. प्रभुरामचंद्रांनी, अगस्ती आश्रमातील निवास काळात, श्री सिद्धेश्वरांची उपासना केली असावी; याची साक्ष, नजिकच उभारलेले वनवासी श्रीराम मंदिर देते. श्री विनायक, जगदंबा, काळभैरव, कार्तिकेय यांची स्थाने आणि समाधीमग्न अनेक विभूतिमत्त्वे या ऐतिहासिक

घटनांची साक्ष देतात. श्री सिद्धेश्वरांच्या मंदिराविषयीची अद्भुत घटना म्हणजे; हे मंदिर, प्रवरातीरी, भूगर्भात, शेतकाम करतांना सापडले. १७८० म्हणजे तीनशे वर्षांपूर्वीची ही घटना, मोठ्या भक्तिभावाने सांगितली जाते. या अद्वितीय शिल्पाचा निश्चित काळ शिल्पशैलींच्या व्यामिश्रतेमुळे ठरविणे कठीण आहे. सापडलेले हे शिवालय किमान दीड दोन हजार वर्षांपूर्वी बांधले असावे; असा कयास बांधता येतो. असे असले तरी महर्षी अगस्त्यांचे वास्तव्य, फार प्राचीन आहे, याची साक्ष श्री वाल्मिकी रामायणात मिळते. म्हणजे शिवांची स्थापना महर्षींनी केली. पुढे कालौघात अनेक राजवटींमध्ये, विविध भक्तांनी हे शिवालय उभारले, पुनरुज्जीवित केले; ही शक्यता नाकारता येत नाही. अकोले नगरीचे हे आराध्य असे क्षेत्रदैवत आहे हे मात्र खरे. तसेच सिद्धेश्वर मंदिर प्रवरासंगम येथे प्रवरेच्या उत्तर तीरावर स्थित आहे.

## श्री सिद्धेश्वरांची आरती

(चाल– शिवपुराणातील– आषुतोष शशांक शेखर चंद्रमौळी चिदंबरा ।
कोटी कोटी प्रणामशंभो कोटी नमन दिगंबरा ।।)

नारायणा केळेश्वरा । जय वैभवी गंगाधरा ।
कोटी कोटी प्रणाम शंभो । कोटी नमन सिद्धेश्वरा ।।धृ।।

ऋषी अगस्ती स्कंदस्वामी । प्रभुराम नित नमिती तुला ।
योगीनी जगदंब माता । करीत सिद्धी कौतुका ।
विनायक हा सिद्धिदाता । लक्ष्मी यश श्री कीर्ति दा ।

जय नटेश्वर कला लीला । उमापति शिवशंकरा ।।१।।
कोटी नमन...
वामअंगी विमल गोदा । स्वये अमृतवाहिनी ।
करीत सुफला जंबुद्विपा । तव कृपे योगेश्वरा ।
शिव महिम्ना गात शिल्पे । शोभिती तव मंदिरी ।
मंडपी गण नृत्य करिती । सत्य शिव हे सुंदरा ।।२।।
कोटी नमन...

ब्रह्मवृंद ही करिती घोषा । महारुद्र महेश्वरा ।
अष्टभैरव जागविती । दशदिशा सिद्धेश्वरा ।
मास श्रावण पुण्यकाली । ऋद्राभिषेकायोजिती ।
पारणी जन मिरविती तुज । पालखी सिद्धेश्वरा ।।३।।
कोटी नमन...
पार्वतीपते हर हर हर महादेव श्री सिद्धेश्वर महाराज की जय!

*

## आरती श्री प्रवरामातेची

**(श्री गंगेच्या आरतीची चाल)**

प्रवरामाईविषयीची कृतज्ञता, आपण वेगळ्या प्रकारे व्यक्त करीत आहोत. एखाद्या नदीचे, गॅझेट, अर्थात अधिकृत राजपत्र होण्याचा पहिला मान, प्रवरा नदीला मिळाला, याचा अभिमान वाटतो. 'गंगेच यमुने चैव कृष्णे गोदे सरस्वती नर्मदा सिंधू कावेरी' या सप्त नद्यांमधील, कृष्णा, गोदावरी आणि कावेरी, या सह्याद्रीच्या कुशीत, उगम पावलेल्या नद्या आणि त्यांच्या उपनद्या, ह्या सह्याद्री एवढ्याच प्राचीन होत. पेहरा, प्रवरा, अमृतवाहिनी या नावांनी ज्ञात असलेली प्रवरानदी रत्नगड परिसरात उगम पावते आणि प्रवरासंगम येथे गोदावरीला जाऊन मिळते. प्रवरा नदी अतिप्राचीन मानवी संस्कृती फ ुलविणारी नदी आहे. समुद्रमंथन प्रसंगापासून, रामायण, ज्ञानेश्वरीलेखन आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यापर्यंतचा इतिहास प्रवरामातेने अनुभवला

आहे. श्री वाल्मिकीऋषी, श्री अगस्तीमुनी, श्री नारद मुनी आदि अनेक ऋषींची आश्रमस्थाने प्रवरातीरी आहेत. शिवशक्तीपीठे आणि मोहिनीराज स्थान यांनी तसेच प्रभुरामचंद्रांच्या पदस्पर्शाने प्रवरा नदीचे सांस्कृतिक महत्त्व वाढवले आहे. कृष्णवंती, आढळा, म्हाळुगी आणि मुळा यांसह अनेक जलप्रवाहांनी पुष्ट होत, प्रवरा गोदावरीला मिळते. 'प्रवरापानम् गोदास्नानम्।' अशी म्हण प्रचलित आहे. प्रभुरामचंद्रांनी अगस्ती आश्रमात व प्रवरातीरी निवास प्रवास आणि शिवशक्तीची पूजा करून; एकप्रकारे प्रवरा परिक्रमा केली आणि विजयाचा आशीर्वाद मिळविला. प्रवरा परिक्रमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपणा सर्वांकडूनही, प्रवरा वंदना, पूजा, परिक्रमा, अर्चना घडावी, यासाठी, श्री प्रवरेची आरती सादर केली आहे.

ॐ जय प्रवरा माते हे श्री जय प्रवरा माते ।
अमृत स्रवते निशिदिनी २
ऋषीमुनी कुल माते ।।धृ।। ॐ जय प्रवरा माते ।
सागर मंथनी निपजती रत्ने दिव्य अशी ।
अमृतकुंभ ही निपजे रत्नाकर उदरी ।
विष्णू मोहिनी स्वरूपा योजित रत्नगडी
मानवलोक तराया धारांमृत देती ।।१।। ॐ जय प्रवरा माते ।

कळसाईचि गोमाता एकच प्रवराई ।
सुजला सुफला करिते अगस्तीपुर क्षेत्री ।
वाल्मिकी तातोबा अगस्ती महर्षी ।
अगस्ती गुरुकुल थाटे रामायण लिखती ।।२।। ॐ जय प्रवरा माते।

कृष्णवंती म्हाळूगी अढळा मूळमाता येती ।
मिळूनी प्रवरे उदरी गुरु चरणी नमिती ।
प्रवरा संगम होता तीर्था नवलाई ।
प्रवरा होऊनी गोदा महानदी होई ।।३।। ॐ जय प्रवरा माते ।

शिवशक्तीची पीठे तीरावर सजती ।
स्वीकारूनी प्रभूपूजा यशवचना देती।
श्री सिद्धेश्वर सिद्धा कृपानिधी।
कृपाप्रसादे प्रकटे ज्ञाना ज्ञानेश्वरी ।।४।। ॐ जय प्रवरा माते ।
।।ॐ।। पेहरा, प्रवरा च विद्महे जीवनस्त्रोताय धिमही
तन्नो अमृतवाहिनी प्रचोदयात ।।

*

# महर्षी अगस्त्यमुनींची आरती

जय देव जय देव, जय जय शिवरुपा।
हो अगस्ती मुनिवरा।
तुमच्या सुक्त प्रतापे, तुमच्या सिध्दी प्रतापे ।
सृष्टी सुखरुपा।। जय देव।। धृ।।

इंद्रा मरुता तुम्ही मैत्री घडवूनी।
स्थापियले ऋतुचक्र नित्य नेमूनी।
सिध्दी अथर्वयोगे सागर प्राशुनी ।
देवा रक्षियले असुरापासूनी।।१ ।। जयदेव।।

विंध्या विनम्र करवूनी, शशिसूर्या रक्षिले।
पोथियिली गिरी बैसूनी, हिमगिरी राखिले।
तोलूनी पृथ्वीतलाशी शिवगिरिजा बांधिले।
नहुषा दंडुनी,इंद्रपद राखिले।।२ ।। जयदेव।।

गंगाभागिरथी आणण्या सहाय्य करुनी।
सुजला सुफला केली पूर्वोत्तर भूमी।
नमविला शुरपद्म अहंकार वारुनी।
दक्षिण भू सजला होई कावेरी वरुनी।।३।। जयदेव ।।

लोपामुद्रा वरुनी गोत्रज तारिले।
वातापि पचवूनि पुरुषार्था दाविले।
धनुर्विद्या योजुनि सत्या राखिले।
अथर्वविद्येयोगे, आरोग्या रक्षिले।।४।। जयदेव ।।

अमृतसरिता, गौतमी, गोदा पवित्रा।
ताम्रपर्णी निर्मुनी दावी कौतुका।
अद्वैतामृत वर्षुनी जागवी शिवतत्त्वा।
दंडुनि मनमय दैत्या, रक्षिसी जीवमात्रा।।५।। जयदेव ।।

अतिउग्रा आणि उदारा तू योगीराणा।
जाणूनी भाव मनींचा दे प्रसाद कृपा।
तव शक्ती प्रतापे देशी, जल, दारा, पुत्रा।
पशुधन कृषीधन रक्षिसी। रक्षिसी तव दासा।।६।। जयदेव ।।

अगस्त्यपुरी राहसी चिर सूक्ष्म रुपी।
राखिसी समस्त विश्वा दुरिते वारुनी।
आलो चरणा शरणा अनन्यभावानी।
त्राही विनवी अनिल। मनिषा पुरवूनी।।७।। जयदेव ।।
ॐ ऋषीमुनीवराय विद्महे सिध्ददेवाय धिमही तन्नो अगस्त्य प्रचोदयात।

*



# महर्षी लोपामुद्रा देवींची आरती

जय देवी जय देवी जय अगस्त्यकांते ।
लोपामुद्रा नामे जीववीशी बालके ।।धृ।। जय देवी ।।

महाशक्ती त्रिदेवी तवरुपे होती ।
अगस्त्य प्रकटवी तुते जीवे अद्वैती ।
वेदी प्रकटे तुझी दिव्याद्भूत वाणी ।
अशुभ हरिणी तू गं विद्या रक्षिणी ।।१।।जयदेवी।।

प्रकृतिरुपा तू गं सरितांची जननी ।
प्राणीमात्रा राखिशी तू कृपा नयनी ।
वरप्रदा अग्नीदिव्या तू कौशितकी ।
यज्ञयोगिनी माता तू विद्यासाम्राज्ञी ।।२।।जयदेवी।।

हजार वरुषे वाढवी पुत्रा तू उदरी ।
इग्नवाही दृढस्यूत माता तू गं अग्राई ।
तव प्रसादे चाले यज्ञ निशीदिनी ।
समस्त विद्या होती सुफलित आश्रमी ।।३।।जयदेवी।।

बालक आम्ही सारे ऋषीमुनींचे दास ।
अंकी घेऊन आम्हा सांभाळी नित्य ।
विदर्भकन्या मिरविशी जगताची जननी ।
व्हावे वरदायिनी तू गं अनिल तव चरणी ।।४।।जयदेवी।।
।। ॐ अगस्त्यकांताय विधमहे मातृशक्ती यधीमही तन्नो लोपामुद्रा प्रचोदयात ।।

*

# रोकडोबांची आरती

अकोले अगस्त्यपुर क्षेत्राचा शिवरक्षक श्री संकटमोचक रोकडोबा हनुमान हे प्राचीनतम ग्रामदैवत आहे. अगस्त्यपूर क्षेत्रातून परिक्रमा प्रवास करतांना प्रवेशाला प्रवरेच्या दक्षिण तीरावर हे स्थान आहे. श्रीमद् हनुमान यांचे दक्षिणमुखी रूप झटपटिया हनुमान किंवा रोकडोबा या नावाने लोकजीवनात प्रसिद्ध आहे. चिरंजीव हनुमानांचे महात्म्य भारतीय परंपरेत सर्वांना माहीत आहेच. सकळ सत् मनोरथे तात्काळ पूर्ण करणारे हे दैवत श्री शनीमहाराज यांच्या साडेसाती पीडेसह सर्व संकटे दूर करून सर्व भक्तांचा सांभाळ करते.

ॐ जय हनुमन रोकडोबा । रुद्रा जय हनुमन रोकडोबा ।
संकटमोचक सकला । झडकरी कलीयुगा ।।धृ।।

दाही दिशांचा स्वामी । भैरवनाथ रुपे ।
शिवरुप प्रकटूनी सकला । रक्षक हो कोतुके ।
भूतपिशाच्य चेटूक । पापी दुष्टांना ।
निर्दालुनी क्षणमात्रे । रक्षीसी सत लोका ।।१।।ॐ...

भवभय हरणा कारण । शरणा तव पायी ।
कृपाप्रसादे तुझीया । निष्कंटक जीवनी ।
श्रीरामांचा सेवक । कल्याणी भक्त असा ।
प्रकटूनी कृपा करावी । अनिला चीरजीवना ।।२।।ॐ...

*



# महर्षी अगस्ति वंदना अर्चना

अकोले येथील प्रवरेच्या उत्तर तीरावर असलेला; महर्षी अगस्ती मुनींचा आश्रम, हे अगस्तीगुरुकुल परंपरेतील केंद्रस्थान आहे. महर्षी अगस्ती हे ऋषीपरंपरेतील त्रिदेव आणि त्रिशक्ती यांची शक्तिमत्ता लाभलेले, शिवस्वरूप असे, भगवान स्वरूप सद्गुरू होत. या आश्रमात महर्षीचा नित्य वास आहे. या आश्रमाला अमृतमंथन प्रसंगातील अमृतकुंभोद्भवापासूनचा इतिहास आहे. सृष्टीरचना आणि सृष्टीव्यवस्थापनाच्या प्रक्रियेत महर्षी अगस्ती मुनींच्या कार्याला आणि या गुरुकुलाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महर्षींनी श्री प्रभुरामचंद्र, श्री लक्ष्मण आणि श्री सीतामाईंना या आश्रमात मार्गदर्शन व उपदेशपूर्वक शुभाशीर्वाद दिले. त्यांची युद्धभूमीपर्यंत पाठराखण केली. 'अगस्त्य' ही कादंबरी, 'अगस्तीमाहात्म्य', 'श्री लोपामुद्राचरित्र', 'अगस्त्य अभंगावली', 'अगस्ती विरचित स्तोत्र मंजुषा', 'अगस्तीमित्रावरुण विरचित सुक्ते' अशा पुस्तकांतून महर्षींची माहिती सर्वांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहेच. सहज स्मरणसेवेसाठी आणखी एक महर्षी अगस्ती यांना वंदना व अर्चना येथे सादर केली आहे.

**(चाल– बद्रिनारायण धाम वंदनेप्रमाणे ।। श्री बद्रिनाथ विश्वंभरम् ।।)**

रान गर्द सुगंध सुमिरण । मुनी आश्रम शोभिता ।
समिप प्रवरा स्रवत अमृत । नमु अगस्ति ऋषीवरा ।।धृ।।

क्षेत्र पावन धरणी ऐसे । सर्वकाल अबाधिता ।
कृपा करि शिवशक्ती स्कंद । विष्णूलक्ष्मी विनायका ।
श्रमिक कृषिवल ज्ञानमार्गी । राजधर्म व्यवसायिका ।
महर्षी कारुण्यमूर्ती । करित जडजीव पावना ।।१।।
नमु अगस्ति...

सिंधू विंध्य वातापि इल्वल । अहं त्यांचा मर्दिला ।
इंद्रमरुता स्नेह साधुनी । निर्मिले ऋतुचक्रया ।
आयु धनु अन ज्योति वेदे । साधिले जनमंगला ।
दिव्य भार्या ऋषी लोपा । शोधिले स्व गोत्रजा ।।२।।
नमु अगस्ति...

दिव्य सुक्ते दिव्य स्तोत्रे । दिव्य अस्त्रे निर्मिता ।
देव मानव जीवलोका । रामसीता रक्षिता ।

आश्रमी नित घोष चाले । वेद ज्ञाना साधना ।
जय हो जय जय जय महर्षी । नमु अगस्ति मुनीवरा ।।३।।
नमु अगस्ति ...

ॐ ऋषीमुनीवराय विधमहे सिद्ध देवा यधी मही
तन्नो अगस्त्य प्रचोदयात
ॐ श्री भगवान अगस्तिमहाराज की जय!

*

## पायी दिंडी सोहळ्यातील महर्षी अगस्ति मुनींची आरती

महर्षी अगस्त्यांच्या पालखी- पायी दिंडी सोहळ्याच्या प्रसंगी, भजनकरी टाळकरी यांना श्री ज्ञानोबा तुकोबांच्या आरती बरोबर महर्षीची आरती म्हणता यावी, याकरिता पुढील आरती सेवा

आरती मुनिवरा । स्वामी महर्षी अगस्त्या ।
भजती भक्त जन । भाव ठेवितो पाया ।।धृ।।
आरती मुनिवरा...
विचलित सृष्टि होई । अहंकार बळावे ।



त्रिदेवशक्ती सहित । मित्रावरुणी प्रकटे ।।१।।
आरती मुनिवरा...

करी जडजीव नियमित । विश्व सांभाळी अवघे ।
सद्गुरु चरणी अनिल । आम्ही मस्तक ठेविले ।।२।।
आरती मुनिवरा...
ॐ श्री भगवान अगस्तीमहाराज की जय

*

## श्री ऋषी मुनी, सिद्ध अगस्ती महाराजांची आरती

जय जय शिवरुपा। हो अगस्ती मुनिवरा ।
तुमच्या सुक्त मा सिजी प्रतापे । सृष्टी सुखरुपा।। जय देव ।। धृ ।।

इंद्रा मरुता सुजीती स्यापियले अतुचक्र नित्य नेमूनी ।
सिध्दी अथर्वयोगे सागर असुरापासूनी ।।१।। जयदेव।।
विंध्या विनम्र करवूनी, शशिसूर्या रक्षिले ।
पोथियिली गिरी बसूनी, हिमगिरी राखिले ।
तोलूनी पृथ्वीतलाशी शिवगिरिजा बांधिले ।
नहुषा दंझी, इंद्रपद राखिले ।।२।। जयदेव ।।

गंगाभागिरथी आणण्या सहाय्य करुनी।
सुजला सुफला केली पूर्वोत्तर भूमी।
नमविला शुरपद्म अहंकार वारुनी।
दक्षिण भू सजला होई कावेरी वरुनी ।।३ ।। जयदेव ।।

लोपामुद्रा वरुनी गोत्रज तारिले ।
वातापि पचवूनि पुरुषार्था दाविले।
धनुर्विद्या योजुनि सत्या राखिले।
अथर्वविद्येयोगे, आरोग्या रक्षिले ।।४ ।। जयदेव ।।

अमृतसरिता, गौतमी, गोदा पवित्रा।
ताम्रपर्णी निर्मुनी दावी कौतुका ।
अद्वैतामृत वर्षनी जागवी शिवतत्त्वा।
दंडुनि मनमय दैत्या, रक्षिसी जीवमात्रा ।।५ ।। जयदेव ।।

अतिउग्रा आणि उदारा तू योगीराणा।
जाणूनी भाव मनींचा दे प्रसाद कृपा।
तव शक्ती प्रतापे देशी, जल, दारा, पुत्रा।
पशुधन कृषीधन रक्षिसी । रक्षिसी तव दासा ।।६।। जयदेव ।।

अगस्त्यपुरी राहसी चिर सूक्ष्म रुपी।
राखिसी समस्त विश्वा दुरिते वारुनी।
आलो चरणा शरणा अनन्यभावानी।
त्राही विनवी अनिल। मनिषा पुरवूनी।७।। जयदेव ।।

ॐ ऋषीमुनीवराय विद्महे सिद्धदेवाय धिमही तन्नो अगस्त्य प्रचोदयात ।

*



# श्री ऋषी लोपामुद्रा देवींची आरती

जय देवी जय देवी जय अगस्त्यकांते ।
लोपामुद्रा नामे जीववीशी बालके ।।धृ।। जय देवी ।।

महाशक्ती त्रिदेवी तवरुपे होती ।
अगस्त्य प्रकटवी तुते जीवे अद्वैती ।
वेदी प्रकटे तुझी दिव्याद्भूत वाणी ।
अशुभ हरिणी तू गं विद्या रक्षिणी ।।१।।जयदेवी।।

प्रकृतिरुपा तू गं सरितांची जननी ।
प्राणीमात्रा राखिशी तू कृपा नयनी ।
वरप्रदा अग्नीदिव्या तू कौशितकी ।
यज्ञयोगिनी माता तू विद्यासाम्राज्ञी ।।२।।जयदेवी।।

हजार वरुषे वाढवी पुत्रा तू उदरी ।
इझवाही दृढस्यूत माता तू गं अग्नाई ।
तव प्रसादे चाले यज्ञ निशीदिनी ।
समस्त विद्या होती सुफलित आश्रमी ।।३।।जयदेवी।।

बालक आम्ही सारे ऋषीमुनींचे दास ।
अंकी घेऊन आम्हा सांभाळी नित्य ।
विदर्भकन्या मिरविशी जगताची जननी ।
व्हावे वरदायिनी तू गं अनिल तव चरणी ।।४।।जयदेवी।।
।। ॐ अगस्त्यकांताय विधमहे मातृशक्ती यधीमही तन्नो लोपामुद्रा प्रचोदयात ।। ॐ श्री लोपामुद्रामाता की जय !

*

# आरती महालक्ष्मीची

महालक्ष्मी देवस्थान हे अकोलकरांचे ग्रामदैवत शक्तिपीठ आहे. ज्येष्ठा कनिहा अशा जोड शक्तिरूपांत दोन शक्तिरूपे आहेत. अकोले गावात अनेक उत्सवी जागृत शक्तिरूपेही पाहावयास मिळतात. प्रवरेच्या उत्तर दक्षिण तीरावर अनेक प्राचीन सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्वाची शक्तिपीठे आहेत. सह्याद्रीचे सर्वोच्च शिखर हे कळसूबाई नामक प्रसिद्ध शक्तिपीठ आहे. रंधाफॉल येथे घोरपड्याई, गरदनी गावाजवळ वज्रेश्वरी, उत्तरेत टहाकारी क्षेत्री टाहाकारी देवी आणि विश्रामगडावर अर्थात पट्टागडावर पट्ट्याई पाहावयास मिळते. निळवंडे धरणाजवळ म्हाळादेवी नामक म्हाळसाईंचे अतिप्राचीन असे क्षेत्रीय शक्तिपीठ आहे. इगतपुरीपासून प्रवरासंगमापर्यंत दंडकारण्यांतर्गत तपोवनात प्रवरेच्या दोन्ही तीरावर अक्षरशः असंख्य शक्तिस्थाने विराजमान आहे. ग्रामदैवते, स्थानदैवते, मावलया, आसरा, अशी कितीतरी शक्तिस्थाने महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, महामाया, मातृका अशा स्वरूपात शक्तींचे जागरण करतात. ही सर्वस्थाने तांदळा किंवा मूर्ती यांच्या स्वरूपात आहेत. या शक्तिपीठांची लळिते किंवा बोहाडे किंवा आखाडी स्वरूपात नाट्योत्सव परंपरा आहेत. या सगळ्यात कोल्हार येथील भगवतीपूरगामी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे एकत्रित विराजमान आहे, तर नेवासे गावी मोहिनीराज स्वरूपात विष्णूस्वरूपा मोहिनींचे आणि म्हाळसा देवींचे मंदिर आहे. ही मंदिरे ऐतिहासिक पौराणिक घटनांची साक्ष देत प्रागऐतिहासिक संस्कृतीचे जागरण करतात. या सर्व देवतांच्या वैशिष्ट्यपूर्ण दैवतकथा, आख्यायिका, दंतकथा प्रवराखोऱ्यात लोकगंगेत पुन्हा पुन्हा प्रगट होतात. नवरात्र महोत्सव आणि यात्राजत्रा महोत्सव हे सर्वच देवतांचे वैशिष्ट्य आहे. अगस्ती आश्रमात अगस्त्य कांता ऋषी लोपामुद्रा किंवा अग्नाई हे स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण वैदिक ऋषीस्थान आहे. या सर्व देवतांची आरती सेवा करूया –



जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मीमाते ।
चराचरी वसशी तू शक्तिरुपे ।।धृ।। जयदेवी ।।

असंख्यरुपे तू प्रकटशी या जगती ।
लक्ष्मी काली सरस्वती तूच चित्शक्ती ।
ज्येष्ठा कनिष्ठा सप्त, पंच, माता तू आई।
चौसष्ठपीठा प्रकटसी तू जगताची जननी ।।१।। जयदेवी ।।

मर्दूनी अगणित असूरा मिरविशी साम्राज्ञी ।
नीरक्षीर फलपुष्पे कृषीधन निर्मिशी ।
स्तन्य देऊनी सर्वा जननी जोगविशी ।
शक्ती बुद्धी लक्ष्मी होऊनी जगता सांभाळी ।।२।। जयदेवी ।।

परोपरी शक्तीचा विजयोत्सव होयी ।
यज्ञ यागा साधुनी तव सेवा करिती।
मंत्र तंत्र घोषिती नृत्ये अंगणी जागविती ।
होऊनी प्रसन्न अनिला चिदानंद देशी ।।३।। जयदेवी

विश्वशक्तीच विधमहे मातृदेवता यधीमही तन्नो देवी प्रचोदयात

*

# श्री प्रभू रामचंद्रांची आरती

प्रवरातीर परिसरात प्रवरातीरी प्रभुरामचंद्रांच्या पदस्पर्शाची अनेक स्थाने आहेत. तसेच प्रभुरामचंद्रांची मंदिरे आहेत..

श्री क्षेत्र अकोले येथे प्रभुरामचंद्रांची चार मंदिरे आहेत, तर राजूर येथे एक मंदिर आहे. अलिकडे निरनिराळ्या ठिकाणी राममंदिरे झाली

आहेत. प्राचीन परंपरेतील चार राममंदिरांपैकी एक श्रीमहर्षी अगस्ती आश्रमात आहे. त्याला श्री विष्णूमंदिर असेही म्हणता येईल. या आश्रमात श्रीरामांचा निवास काही दिवस होता. ह्याची साक्ष श्री रामकुंड, श्री सीताकुंड, श्री लक्ष्मण कुंड (आता नाहिसे झाले आहे) श्री अगस्ती कुंड अशी पुष्करिणी म्हणता येतील अशी जलकुंभे आहेत. श्री अगस्ती पंचायतन असे म्हणता येईल असे ठिकाण म्हणजे अतिप्राचीन असे श्री सिद्धेश्वरांचे मंदिर, या मंदिरानजिक प्रभूरामचंद्रांचे स्वतंत्र मंदिर आहे. हे मंदिर वनवासीराम मंदिर म्हणून ओळखले जाते. तिसरे मंदिर चिरेबंदी या प्राचीन ऐतिहासिक परिसरात नारायणेश्वर मंदिराजवळ प्रभुरामचंद्रांचे स्वतंत्र मंदिर आहे. ह्या मंदिरानजिक नरसिंह मंदिर होते. चवथे मंदिर मारवाडी राम मंदिर म्हणून ओळखले जाते. राजूरला शहराच्या मध्य चौकात प्रभुरामचंद्रांचे ऐतिहासिक व पौराणिक मंदिर आहे. प्रवरासंगमाजवळ तपोवनात मारीच वधाची कथा सांगितली जाते.

शिंगवे तुकाई येथे श्री भगवती पार्वती व श्रीराम लक्ष्मण भेट आणि कोल्हाळेश्वराचे मंदिर आहे.

प्रवरेच्या तीरावरील ह्या या सर्व स्थानांबरोबरच कोल्हार भगवतीपूर येथे प्रभूरामचंद्र स्थापित पूजित महत्त्वाचे मंदिर आहे. या मंदिरापासून प्रभूरामांशी संबंधित अशी महत्त्वाची अतिप्राचीन, रामायण उल्लेखित तीन स्थाने आहेत. एक रंधाफॉल जवळ, पलिकडे सीतापाऊल पाणवठा आणि चढून वर गर्दरानात तातोबाचा म्हणजे ऋषी वाल्मिकींचा मठ व तेथून बऱ्याच अंतरावर ध्यानस्त महर्षी वाल्मिकी म्हणजे आजुबा पर्वत. यातील तातोबा आणि आजुबा ही दोन्ही नावे लवांकुशाचे संदर्भाने महर्षी वाल्मिकी यांना मिळालेली. दुसरे स्थान सर्वतीर्थ जटायूतीर्थ टाकेद आणि तिसरे स्थान सर्वतीर्थ तेलंगणची वाडी. जेथे श्री लक्ष्मणांनी श्री सीतामाईंना प्रभूरामचंद्रांच्या आज्ञेनुसार आणून सोडले. तेथून त्यांचा सांभाळ श्री महर्षी वाल्मिकींनी केला. तिसरे स्थान उंच खडकचे राममाळ हे होय. येथूनच प्रवरा ओलांडून श्रीराम अगस्ती



आश्रमात आले असावेत.

जय देव जय देव जय विष्णू अवतारा, प्रभूरामचंद्रा ।
आरती ओवाळू, भावार्ती ओवाळू मनुजावतारा ।।धृ।। जयदेव

सहीत लक्ष्मण सीता । अगस्त्याश्रमी येशी ।
अगस्त्य ऋषीवर आज्ञे । पंचवटी रमशी ।
तव पदस्पर्शे पावन । तपोभूमी होयी।
तपि, ऋषी मुनी साधक । रक्षण धर्माचे करिशी ।।१।। जयदेव

सीताशोधन करिता । प्रवरातिरी येशी ।
अगस्तिपुर क्षेत्रा । पावन हो करिशी ।
महर्षी अगस्त्य कृपे । दिव्यास्त्रे घेशी ।
प्रवरातीरी क्रमता । शिवसाधना करिशी ।।२।। जयदेव

अमृत वाहिनी प्रवरा । परिक्रमा करशी ।
प्रवरा तटी शिवकृपा । साधनी मिळविशी ।
कौतुक करण्या पार्वती । सीता माई होयी।
तू का आई संबोधे । कृपावंत होयी ।।३।। जयदेव

समस्त तीर्था प्रेरुनी । जटायू उद्धरिशी ।
वाल्या होऊन वाल्मिकी । रामायण लिखती ।
सीतामाई नि लवकुश । तातो सांभाळी ।
राजूर, राममाळ, अकोले । कोल्हाळी रमीशी ।।४।। जयदेव

रघुकुलभूषणाय विधमहे सीताकांता यधी मही
तन्नो रामचंद्रो प्रचोदयात ✻

# म्हाळसाईंची आरती

प्रवरा तीरावर वसलेल्या इंदुरी, मेहेंदुरी, चितळवेढे, निळवंडे, विठे आणि राजूर या परिसरातील सांस्कृतिकदृष्ट्या पवित्र क्षेत्रांच्या सान्निध्यात, म्हाळादेवी हे अतिशय पावन तीर्थक्षेत्र आहे. मार्तंडभैरव अवतारात श्री विष्णूस्वरूपा मोहिनींनी श्री महादेवांना दिलेले, भार्यास्वरूपात सेवा करण्याचे अभिवचन या क्षेत्री, म्हाळसादेवींनी कठोर तपश्चर्यापूर्वक, पार्वती स्वरूप होऊन पूर्ण केले. मोहिनीराज निधीनिवास किंवा नेवासा येथे म्हाळसा किंवा महालया अवतार घेऊन प्रकटल्या. शिवशिवा आणि श्री विष्णूलक्ष्मी यांच्या अद्वैत योगाचे हे आणखी एक स्वरूप. प्रवरातीरावर घडणाऱ्या या अद्वैत सिद्धी योगात, नेवासा हे म्हाळसांचे जन्मस्थान. ह्या घटनेलाही श्री नारदमुनी आणि महर्षी अगस्तीमुनी हे साक्ष आहेत. जन्मस्थानाजवळच श्री नारदमुनींचे महर्षी अगस्त्यांनी स्थापित केलेले मंदिर आहे. त्याचे समाजकंटकांनी दर्यात रूपांतर केले होते परंतु सद्भक्तांनी त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मोहिनीराजांची पालखी प्रतिवर्षी या दोन्ही स्थानी भेटीस येते. ही परंपरा इतिहासाची साक्ष देते. म्हाळादेवी हे ग्राम, या तीर्थक्षेत्रांमुळे आकारले. ही म्हाळसाची मार्तंडभैरवांना प्राप्त करण्यासाठीची तपोस्थली. येथेच भगवान शिव मार्तंडभैरवावतारात म्हाळसाकांत झाले. हे क्षेत्रीय दैवत अतिप्राचीन असून असे स्थान अन्यत्र कोठेही नाही. अमृतमंथन, प्रवरावतरण यांची साक्ष देत हे स्थान भारतीय प्राचीनतम सनातन संस्कृतीच्या प्रवरातीरीच्या खाणाखुणा जागविते. म्हाळादेवी प्रापंचिकांसाठी अतिशय जागृत असे लोकदैवत आहे. प्रतिवर्षी येथे प्रदीर्घकाळासाठीची यात्रा भरते. परिसराची अध्यात्मिक आणि व्यावहारिक समृद्धी पेठ म्हणून या यात्रेचे महत्त्व आहे.




जय देवी जय देवी जय भैरवी माते
मार्तंडांच्या सेवे मोहिनी म्हाळसाई रुपे ।। जय देवी ।।धृ।।

अगाध महिमा तुझा योगिनी अद्वैता ।
अर्धनारी नटेश्वर राजमोहिनी स्वरुपा ।
प्रवरातीर गरजे शिवविष्णू स्वरुपा ।
तुझिया लीले लाभे अमृत जनलोका ।। जयदेवी ।।१।।

निधीनिवासी प्रकटसी आर्ता ताराया ।
तपसाधूनी निःसीम मनोरथा सिद्धा ।
म्हाळादेवी ग्रामा अपूर्व शुभ तीर्था ।
लोकोत्सव करिती मिरविती मार्तडकांता ।। जयदेवी ।।२।।

*

# प्राचार्य डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांचा व्यक्ती-परिचय



**नाव** : अनिल नागेश सहस्त्रबुद्धे
**जन्म** : २४ ऑगस्ट १९४७ (अकोले, अहमदनगर)
**शिक्षण** : टी.डी., बी.एड., एम.ए. (मराठी), पीएच.डी.
**पत्ता** : 'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, (हॉटेल सागरच्या मागील बाजूस), पाईपलाईन रोड, अहमदनगर. महाराष्ट्र.
दूरध्वनी (०२४१) २४२४१६७, भ्रमणभाष ९८८१५००९४२.
usahasrabuddhe@gmail.com,
Website : www.anilsahasrabuddhe.com

## पीएच.डी.

'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'. पीएच.डी. साठी प्रबंध पुणे विद्यापीठ. पीएच.डी. १९७९-८०.

## प्रसिद्ध साहित्य

**अ) संशोधन / समीक्षा / वैचारिक :**

**लोकसाहित्य :**

१) चाळीसगावडांगाणी (खंड १) लोकवाङ्मय- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३.
२) चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक आकलन- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३.
३) लोकसाहित्य विचार : सविता प्रकाशन, औरंगाबाद १९९०.
४) लोकबंध : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९५, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२.
५) लोकसाहित्य संशोधन पद्धती : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९७, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२.
६) लोकसाहित्याचा अन्वयार्थ : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००३.
७) लोकसाहित्याच्या अभ्यासातील चकवे आणि उतारे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०१०.
८) लोकबंधात्मक चिकित्सा : नितीन प्रकाशन पुणे, प्रकाशक श्री. नितीन गोगटे, २०१२.
९) लोककला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०२१.
१०) लोकसंस्कृती व लोकसाहित्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०२१.

**संत साहित्य :**

१) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९१, द्वितीय आवृत्ती २००५.
२) लोकी अलौकिक तुकाराम : प्रकाशक डॉ. लहवितकर प्रोफेसर व प्रमुख श्री तुकाराम अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे २०१२.
३) (सार्थ) 'बालावबोध' : समर्थ स्वामी त्र्यंबकराज महाराज (भावानुवाद) - समर्थ स्वामी त्र्यंबकराज देवस्थान ट्रस्ट, देवळाली प्रवरा, राहुरी, अ.नगर २०१२.
४) '(सार्थ) योगसंग्राम' संत श्री शेख महंमद महाराज (भावानुवाद) : संत श्री शेख महंमद महाराज उत्सव समिती ट्रस्ट श्रीगोंदा, अहमदनगर २०१४.
५) 'संतांचिया संगे' : मोरया प्रकाशन, पुणे/डोंबिवली २०१४.
६) आदिमांचे वर्तमान : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१५
७) श्री संत शेख महाराजकृत अभंगवाणी : श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, फेब्रुवारी/मार्च २०१७.
८) संत वाङ्मयाच्या आशयनिष्ठ अभ्यासाची दिशा : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २४ ऑगस्ट २०१८.
९) संत वचनांची मात : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१.
१०) संत प्रबोधित मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१.
११) अमृतगुटिका : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१
१२) स्वरूपाशी संवाद : पसायदान, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.
१३) हरिपाठ (हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन) : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.
१४) नमामि देवी अमृते : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.

**साहित्यशास्त्र / समीक्षा :**

१) प्रस्तावना : स्वरूप आणि संकल्पना : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७.
२) समीक्षा : प्रयोजन आणि कार्य : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००८.
३) 'साहित्याची समग्रता' : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१७.
४) वाङ्मय संस्कृती : साद-संवाद, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २४ ऑगस्ट २०१९.

**संशोधन / तत्त्वज्ञान / वैचारिक :**

१) अन्नासाठी दाही दिशा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००२.
२) आदिमांचे वर्तमान : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.
३) लोकनिष्ठ अध्यात्मवाद : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१६.
४) 'लोकधर्म' : आनंदोत्सव, नगर २०१६. २१) 'लोकार्थ'- आनंदोत्सव नगर २०१७,
५) शोध पांडुरंगाचा : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१९.
६) चिंतन मोती : आनंदोत्सव, नगर २०१८.
७) मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१.
८) रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.
९) प्रवरा परिक्रमा : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२२.

**चरित्र :**

१) संत शेख महंमद महाराज : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे (संत द्वादशी प्रकल्पांतर्गत)- जुलै २०१८.
२) 'कैवल्यगंध' : आनंदोत्सव, नगर २०१६.

३) हनुमान चरित्र : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१.

**ब) ललित साहित्य :**

**कादंबरी :**

**अ) सामाजिक :**

१) डांगाणी : परिमल प्रकाशन. औरंगाबाद १९८५.

२) काळ साद घाली : 'अद्‌भूत कादंबरी' मासिक, संपा. ग. वा. बेहेरे १९८६.

३) वावटळ : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८७.

४) भेद : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८८.

५) मातंगी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९२.

**ब) नवप्रयोगात्मक :**

१) सत्यनारायण थापाडे पाटील : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९३.

२) परवेडा : प्रीती प्रकाशन, पुणे २००२.

३) अनंत : विमल पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, मार्च २०१९.

**क) पौराणिक चरित्रात्मक :**

१) 'अगस्त्य' : पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे २८, फेब्रु. २०१०, द्वितीय आवृत्ती २०१७, ('अगस्त्य' कादंबरीचा इंग्रजी अनुवाद व कन्नड अनुवाद ई-बुक).

२) 'नारद': पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१७.

**ड) अद्‌भूत :**

१) क्षयवटाच्या पारंब्या : राहुल प्रकाशन, मुंबई १९९२.

२) साक्ष पंचाहत्तरी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२२.

**इ) ऐतिहासिक :**

१) अहिनकुल : परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८६.

**कथासंग्रह :**

१) इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा : क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, नगर २००१.

२) कारव : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२.

३) विलक्षण : प्रीती प्रकाशन, पुणे २००३.

४) नारद ब्रेकींग न्यूज : पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१२ ('बापाचे बाप सोऽहम' - नारद ब्रेकींग न्यूज, इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे-देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

**नाटक :**

१) भरारी आणि भानगडी : नंदा प्रकाशन, मुंबई २००१.

२) संभव असंभव : प्रीती प्रकाशन, पुणे २००२. (नाटकांचे विविध प्रयोग झाले)

३) जातक यज्ञ : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१.

**एकांकिका :**

१) कातळी निखारे : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.

**कवितासंग्रह :**

१) आव्हान : स्फूर्ती प्रकाशन, नगर १९९४.

२) कोऽहम : हेमंत प्रकाशन, नगर २००६.

३) प्रिया : हेमंत प्रकाशन, नगर २००६.

४) श्री अगस्त्य महात्म्य : प्रकाशक सौ. उषा सहस्रबुद्धे, नगर (प्रथमावृत्ती) २००८, (द्वितीय आवृत्ती, प्रकाशक श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले फेब्रुवारी २०१८) (पोथी)

५) मानसतरंग : क्रिएटिव्ह प्रकाशन, डिसेंबर २०११.

६) ऋषी लोपामुद्रा चरित्र : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८)

७) ऋषी अगस्त्य नित्यपाठ-अभंग : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८)

८) श्री अगस्त्यऋषी अभंगावली : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८).
(श्री अगस्त्य महात्म्य कन्नड अनुवाद श्री. श्रीकांत पाठक, कल्याण, आनंदोत्सव, नगर २०१५)
('आव्हान'चा हिंदी अनुवाद डॉ. अमरजा रेखी ('चुनौती') आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)
('प्रवरामाय' कवितेचा इंग्रजी अनुवाद प्रा. स्फूर्ती सहस्रबुद्धे-देशपांडे, आनंदोत्सव प्रकाशन, द्वितीय आवृत्ती)

९) आरती संग्रह : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२

**ललित/चिंतनात्मक :**

१) जनात आणि मनात : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२.

२) मनात आणि अवकाशात, मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.

३) स्पंदन शिल्पे : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर, ऑगस्ट २००९.

४) गौरव गाभारा : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१.

५) मनाशप्पत खरं सांगेन : (प्रेसकडे)

**संपादित :**

१) ज्ञानवेध : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९० (डॉ. मोरजे गौरवग्रंथ)

२) तेजाची लेणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९९(स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी कुसुमाग्रज आणि शाहीर अमरशेख यांच्या राष्ट्रीय जाणिवेच्या निवडक कवितांचा संग्रह. पुणे विद्यापीठाचे एफ.वाय.बी.ए.साठी नेमले गेलेले पाठ्यपुस्तक.)

३) 'अभंगपौर्णिमा' या ग्रंथात समीक्षालेखन सहभाग आणि संपादन साहाय्य, अभंगपौर्णिमा प्रकल्प प्रमुख, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर. अभंगपौर्णिमा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०११.

४) आनंदमेळा - कविसंमेलन : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर २०१२.

**प्रासंगिक :** विविध दैनिके आणि नियतकालिके यांतून विपूल लेखन.

**मिळालेले महत्त्वाचे पुरस्कार :**

२) 'विद्वत् पुरस्कार' : 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथास 'कांची कामकोटी पीठ', जगद्‌गुरु शंकराचार्यांकडून ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी वर्षात महाराष्ट्रातील निवडक नऊ विद्वानांत विद्वत पुरस्कार (१९९२).

३) संशोधन पुरस्कार : 'लोकबंध' ग्रंथास लोकसाहित्य संशोधन मंडळ, औरंगाबाद येथील

संशोधन पुरस्कार (२०००).

५) तत्त्वज्ञानविषयक श्रेष्ठता पारितोषिक : 'अगस्त्य' कादंबरी, 'अगस्त्य महात्म्य' उपासना पोथी, यासह अन्य लेखनातील तत्त्वज्ञान प्रसृतीकरणाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद श्रेष्ठता पारितोषिक २००९-२०१० या वर्षातील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे राजा फडणीस पुरस्कृत रामाचार्य अवधानी तत्त्वज्ञानविषयक लेखन पारितोषिक. (१६ मे २०१०)

६) साहित्य सेवा पुरस्कार : समग्र साहित्यिक कामगिरीबद्दल 'साहित्यसेवा' पुरस्कार द्वारा पद्मश्री विखे पाटील फौंडेशन प्रवरानगर २०१२

१०) वैचारिक वाङ्मयाचा मु. ब. यंदे पुरस्कार : 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथास नाशिक सार्वजनिक वाचनालयाचा वैचारिक वाङ्मयासाठीचा मु. ब. यंदे पुरस्कार २०१७

११) तत्त्वज्ञान व मानसशास्त्र ना. गो. नांदापूरकर पुरस्कार : 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथास महाराष्ट्र शासनाचा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत सन २०१६ चा एक लाख रुपयांचा 'ना. गो. नांदापूरकर पुरस्कार' २०१७. (वितरण मराठी भाषा गौरव दिनी २७ फेब्रुवारी २०१८)

१२) आदिवासी जीवनावरील उत्कृष्ट लेखन जीवनगौरव पुरस्कार : कै. यशवंतराव भांगरे आदिवासी विकास प्रतिष्ठान, शेंडी (भंडारदरा डॅम) अकोले यांच्यावतीने 'आदिवासी जीवनावरील उत्कृष्ट लेखन जीवनगौरव पुरस्कार' २९ जानेवारी २०१८.

१३) श्रीपाद जोशी ग्रंथकार पुरस्कार : संदर्भग्रंथ अनुवाद आंतरभारती कार्य यासाठीचा 'श्रीपाद जोशी ग्रंथकार पुरस्कार' मे २०१८

१७) संत सेवा गौरव पुरस्कार : संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा यांच्यावतीने ह.भ.प. तथागत श्रीरंग अंबादास लोखंडे स्मरणार्थ पुरस्कार, १४ मार्च २०१९.

१८) ग्रंथ पुरस्कार : 'श्री संत शेख महमद महाराज' या गंधर्ववेद प्रकाशन प्रकाशित ग्रंथास कै. श्री. ना. बनहट्टी स्मृति ग्रंथ पुरस्कार 'पुणे नगर वाचन मंदिर', पुणे, एप्रिल २०१९.

**डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या साहित्यावर झालेले संशोधन आणि समीक्षा ग्रंथ**

* ओंजळीतले मोती, संपादक डॉ. माहेश्वरी गावित, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २००६.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे साहित्य : स्वरूप आणि आविष्कार, संपादक डॉ. भीमा मोदळे व डॉ. सुभाष शेकडे, प्रकाशक- क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, २००३.
* ज्ञानबीजाचा विस्तारू, संपादक डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. सुभाष शेकडे, डॉ. उज्ज्वला जाधव, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २४ ऑगस्ट २००७.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या कादंबरीवर १ पीएच.डी., ७ एम.फिल. झाले आहेत.
* डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या समग्र साहित्यावर १ पीएच.डी. करत आहे.

**डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे संकेतस्थळ** : www.anilsahasrabuddhe.in
संकेतस्थळावर 'अहिनकुल', 'डांगाणी', 'अगस्त्य', 'नारद' अशी जवळपास २० पुस्तके फ्री डाऊनलोड केलेली आहेत. ती पाहता येतील. अनेक लेखकांचे, समीक्षकांचे डॉ. सहस्रबुद्धे यांच्यावरील अभिप्राय विस्तृतपणाने उपलब्ध आहेत. 'साहित्ययात्री' ही स्वतंत्र पुस्तिका २००३ पर्यंतच्या वाङ्मयाचा परिचय करून देते. ती स्वतंत्र प्रसिद्ध आहे.